Historicity Research Journal
Volume 2 | Issue 6 | Feb 2016

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

**Research Article**

# प्राचीन भारतीय चित्रकला

**परमेश्वर हटकर**
माऊली महाविद्यालय, वडाळा ता. उत्तर सोलापूर.

**प्रस्तावना :**

### ❖ ला व ललित कला :-

अंत:करणातील भाव-भावना व्यक्त करण्याचे कौशल्य प्राप्त झाले की, कलेचे स्वरुप प्राप्त होते. कला हा एक जादुगारीन आहे असे म्हणले जाते. तिच्या स्पर्शाने वस्तूला अगर भावनांना चिरंतन प्राप्त होते. भावना उत्कट झाल्या म्हणजे त्यांना प्रत्यक्ष स्वरुप देणे भागच पडते. मग कोणी चित्राच्या द्वारे, तर कोणी मुर्तीच्या द्वारे तर कोणी काव्याच्या द्वारे किंवा त्या त्या मनुष्याच्या आवडी-निवडी प्रमाणे आपल्या भावनेला मूर्त स्वरुप देत असतो. पण ते मूर्त स्वरुप देत असताना त्याने कौशल्य दाखविले तर ती कला झाली. कारण कलेपासून उत्पन्न होणारा आनंद हा पूर्णानंद असतो.

### ❖ चित्रकला व इतर कला :-

चित्रकला कलावंताबरोबर रसिकालाही आनंदात सहभागी करुन घेते. कारण चित्र काढून झाल्यावर कलावंत त्या चित्राकडे रसिकाच्या दृष्टीने पाहतो. म्हणून भवभूतीने कालोहयय 'निखधि विपूलाच पृथ्वी' असे म्हणले आहे. कारण कला ही मुळात निती प्रवर्तक आहे. भारतीय कला ह्या आल्हादोत्पादनाबरोबरच संस्कृतीची जोपासना करणाज्या आहेत, व राष्ट्राची संपत्ती आहेत या सर्व ललितकलेत चित्रकलेचे स्थान अद्वितीय आहे. काव्यगायनादी ललितकलेत चित्रकलेचा तिसरा दर्जा कित्येक कलाभिज्ञांनी ठरविला आहे. परंतू एका दृष्टीने सर्व ललित कलांत या कलेचा दर्जा पहिला मानण्यास मुळीच प्रत्ययवाय नाही. कारण चित्रकलेत अथवा शिल्पकलेत जे दाखविता येत नाही ते थोड्या अवकाशात अनंत विश्व, योग्य रंगरुपात दाखविण्याचे व त्याद्वारे विशाल भावनांचे अविस्कारण चित्रकलेत करता येते तसे शिल्पकलेत करता येत नाही. तसेच गायन अगर काव्यकला या कला शब्दमय आहेत. ते शब्द कर्णन्द्रियाच्या द्वारे आत शिरतात नंतर रसोत्पत्ती होण्यास कालावधी लागतो. गायनात भिन्न भिन्न स्वर कर्णन्द्रियातून मनाला जाऊन भिडेपर्यंत वेळ लागतो शिवाय गायनाला गवयाच्या पाठीमागून अस्तित्व राहत नाही.

काव्य ही विघटनात्मक भाषा असल्याने ती संघटनात्मक भाषेहून कमी दर्जाची म्हणूनच चित्रकला ही या सर्व ललित कलात श्रेष्ट दर्जाची कला म्हणावयास हरकत नाही. कारण ती दृष्यकला असून तिच्या सौंदर्य नेत्राद्वारे प्रकट करता येते. चित्रकला ही मनुष्याला मिळालेली नैसर्गिक देणगी आहे. प्रत्येक मनुष्याला कमी अधिक प्रमाणात या कलेची देणगी आहे. अगदी रानटी अवस्थेतील मनुष्यसुद्धा आपल्या गुहेच्या भिंतीवर चित्र काढीत होता. हातावर निरनिराळी चित्रे गोंदीत होता. मनुष्याची बुद्धी प्रगती प्रिय असल्याने पुढे या चित्रकलेची वाढ झाली.

### ❖ पाश्चिमात्य आणि पौर्वात्य चित्रकला :-

इ.स.१९३० पूर्वीच्या चाळीस-पन्नास वर्षापूर्वीपर्यंत हिंदुस्थानात चित्रकला नव्हतीच असे पाश्चिमात्य चित्रकार आणि कलाभिज्ञ यांचा सर्व साधारण समज होता. प्रसंगोपात्त जी जी पौर्वात्य चित्रे त्यांच्या अवलोकनात आली. ती चिनी, जपानी अथवा पर्शियन चित्रकारांची असावीत असेच त्यांना वाटत असे. हिन्दुस्थानात आढळून येणारी शिल्पकला व चित्रकला ही ग्रीक व रोमन लोकांनी आणली व त्यांच्या योगानी ती वाढीस लागली असे बेधडक विधाने ती करत असत. तेव्हा चित्रकलेकडे जाणून बुजून दुर्लक्ष करण्यात आले हे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृतीत ज्याप्रमाणे भिनत्व आहे. त्याचप्रमाणे दोन्ही चित्रकलामध्येही जमीन अस्मानांचे अंतर आहे. पाश्चिमात्य चित्रकलेचा

उगम ख्रिस्ती सनाचे सुरुवातीस झाला व त्याचे उगमस्थान ग्रीस होय पण त्यावेळेच्या ग्रीक लोकांच्या कलेचे ध्येय वेगळे होते. सत्य हेच सौदर्य हेच सत्य असे ते मानीत.

ग्रीक इटलीमध्ये ही कलेला उत्कर्षाचे दिवस आले. तिथे सिमाबो या प्रसिद्ध इटालियन चित्रकाराचे शिष्य होते. गीओटोच्या दोन शिष्याने आपली कला ऐहिक जीवनाच्या पायावर उभी केली. त्याचा सर्व युरोप खंडाने जयजयकार केला. तर इंग्लंडमध्ये होगार्थ गेम्सबरो, रोनाल्डस इ. चित्रकार होऊन गेले.

हल्लीच्या पाश्चिमात्यांच्या चित्रकलेत भौतिकतेलाच अधिक प्राधान्य दिले जाते. याला कारण पाश्चिमात्यांची हल्लीची संस्कृतीच आहे. कारण ज्या देशात ललितकलांचा उत्कर्ष होतो. त्या देशाच्या सामाजिक राजकीय व धार्मीक आचारविचारांचा प्रभाव त्या कलावर पडणे साहजिकच आहे.

### ❖ भारतीय चित्रकला:-

प्राचीन भारतीय काळात चित्रकला प्रगत होती. अनेक हिंदू राजांनी चित्रकलेला संरक्षण दिलेले आपणास दिसून येते. भारतीय चित्रकार हा सृष्टीचे हुबेहुब अनुकरण न करता तो देखावा पाहून त्यांच्या अंतःकरणात ज्या भावना उद्भूत होतात त्या तो देखाव्याद्वारे व्यक्त करीत असतो. पाश्चिमात्य चित्रकारावर त्यांच्या संस्कृतीची छाप पडल्याचे दिसून येते, तर पाश्चिमात्यापेक्षा भारतीय चित्रकारांचे विचार अधिक धर्मप्रवण असल्याचे दिसून येते त्यांच्या चित्रकलेत सात्विकता उदारता आणि उदासिनता दिसून येते.

हिंदी चित्रकलेत धर्मास प्रमुख स्थान आहे. म्हणून हिंदी चित्रे अगर शिल्पकृती या देवालयांतून व लेण्यातून दिसून येतात. पुराणे, साधूसंत, परमेश्वर अवतार यांचाच या कलेशी फार संबंध येतो. हिंदूशास्त्राप्रमाणे मानवी आकृतीला देवालयाच्या आवारामध्ये स्थान नाही. हा ग्रीक व भारतीय चित्रकलेत दिसून येतो. भारतीय चित्रकला ही ध्येय प्रधान व गुढ आहे असे कित्येकजन म्हणतात. परंतु ती तशी नाही ती कित्येकांना समजत नाही म्हणून तिच्यावर आरोप केला जातो म्हणून भारतीय चित्रकलेकडे पाहावयाचे झाल्यास चर्मचक्षुंबरोबर दिव्यदृष्टीने पाहणे गरजेचे आहे. कारण भारतात राजाचे, देवतेचे, मनुष्याचे चित्र कसे काढावे अस एक नियम घालून दिला आहे. कारण भारतीय चित्रकला ही आकाशात उंच भरारी मारणाज्या गरुडासारखी आहे.

### ❖ भारतीय चित्रकलेचे प्राचीनत्व :-

भारतीय चित्रकलेविषयी अत्यंत प्राचीन पुरावा म्हणजे 'वेद' कारण प्राचीनतम ग्रंथ आहे. वेदांचा काळ इ.स.४००० वर्षे आहे. हे त्यावेळी चित्रकारांचा उल्लेख केला गेला आहे. तो महत्त्वाचा आहे.

'दिव इत्था जीजमत सत्प कारुनहून। चिन्वक्रुर्वयुना गृणतेत:॥'

अशा रीतीने स्वर्गातून सात कारागीर उत्पन्न केले. ते दिवसा गात-गात आपली कामे करतात. त्यात चित्रकार, शिल्पकार, नर्तक, कवी, गायक, वास्तुकार व वाद्यवादक यांचा समावेश होतो.

'अमरकोशाच्या माहेश्वरी टिकेत। कारु शिलची दे चित्रकार दे:॥'

असे म्हणले आहे. कारु म्हणजे चित्रकार, शिल्पकार तेव्हा चित्रकारांचे स्थान सर्वोत्तम होते. वेदकालानंतर उपनिषदकालीन वाड्मयातूनही चित्रकलेचे अनेक पुरावे उदृत करता येतील.

'चित्रभित्ती रिव मिथ्यामनोरमम'

चित्रे काढलेल्या भिंतीप्रमाणे हे सर्व मिथ्या मनोरम आहे. अर्थात या उपमेवरुन त्यावेळी भिंतीवर चित्रे काढण्याची कला अवगत होती.

रामायण, महाभारतात ही चित्रकलेविषयी अनेक उल्लेख आढळून येतात. उदा. मयाने जी धर्मराजाकरीता मयसभा निर्माण केली त्यात अनेक चित्रे काढली होती ती चित्रे पाहून अनेकांना भ्रम उत्पन्न झाला. त्यानंतर उषा आणि चित्ररेखा यांची कथा सर्वांना ठाऊक आहे. 'हरिवंशात' बाणासुराची कथा आहे. या कथेवरुन चित्ररेखेचे चित्र काढण्याचे कौशल्य स्पृहणीय नाही.

'श्रीमद्‌भागवताच्या' दशमस्कंदाच्या उत्तरार्धातील ६२ व्या अध्यायात हीच कथा आहे. रामायणात चित्रशालांचे उल्लेख आढळून येतात. यावरुन रामायण, महाभारतकालीन चित्रे काढण्याची कला अतिशय उच्च दर्जाची होती. याची आपणास कल्पना येते.

चाणक्याच्या 'कौटिलिय अर्थधास्त्रात' (इ.स.पूर्व तिसरे शतक) प्रकरण ७९, पान नं.-२०८ वर 'कारु म्हणजे चित्रकार' याचा स्पष्ट उल्लेख आढळतो.

'कालिदास' म्हणजे ललित कलांचा खरा रसज्ञ त्यांच्या लिखाणात चित्रकलेविषयी अनेक मार्मिक उल्लेख आढळून येतात. 'आयोध्येतील माणसे नाहीशी झाल्यावर त्या आयोध्येत श्वापदे हिंडू लागली', तेव्हा आयोध्येतील कित्येक राजवाड्यांच्या भिंतीवर मोठमोठी पूर्णाकाराची चित्रे काढली होती. त्याचबरोबर 'अभिज्ञान शाकुंतलांत राजाने काढलेल्या चित्राचे मोठं मार्मीक विवेचन केले आहे.

'भवभूतीच्या' उत्तररांमचरित या नाटकात एका चित्रकाराने एक चित्रपट रामास नजर केला. शकुंतलेची मैत्रीण अनुसया ही एक सुंदर चित्रकार होती. रंगाची पेटी, पेन्सील, चित्रफलक, यासंबंधी उल्लेख आढळतात.

इ.स.पूर्व ४०० च्या काळातील 'विनयपीटक' या पाली ग्रंथात राजा पार्श्वनाथ यांच्या विहारगृहातील चित्रकाराचे उत्कृष्ट वर्णात आले आहे. तिबेटचा इतिहासकार तारानाथ यानेही बुद्धांच्या कलेच्या उत्कर्षाचा इतिहास लिहला आहे. भारतीय चित्रकला बुद्धांच्या अगोदर असल्याचे लिहले आहे.

संस्कृत वाङ्मयात चित्रकलेच्या तंत्राबद्दल लिहिलेले स्वतंत्र पुस्तके फारशी आढळत नाहीत.

'कामसुत्र' या ग्रंथात वात्स्यायनाने चित्रकलेची एकंदर सहा अंगे सांगितली आहेत. रुपभेद, प्रमाण-भाव, लावण्ययोजन, सादृश्य, वर्णिकाभंग अशा चित्रकलेच्या वरील सहा अंगावरुन प्राचीन काळी चित्रकला किती उच्चदर्जाची होती याची सहज कल्पना येते. चिनी चित्रकारांनी यथायोग्य रीतीने केलेले चित्रकलेवरुन दिसून येते. अजिंठा चित्रकलेचे जर सुक्ष्म निरिक्षण केले, तर हे सर्व नियम त्या वेळच्या चित्रकारांनी कसे अमलात आणले याची जाणीव होते.

चित्र लक्षण या ग्रंथात चित्रकला या तंत्राचा धार्मीक दृष्टीने उहापोह केला आहे. यातील विवेचन हे बुद्धपूर्व चित्रकलेच्या नियमांना धरुन आहे. यात मुख्यतः

### ❖ अजिंठा चित्रकला :-

हिंदुस्थानातील तीन प्रमुख धर्माप्रमाणे भारतीय चित्रकलेचे मुख्य तीन भेद पडतात. ते असे-बौद्ध, हिंदू आणि मोंगल होते. बौद्ध चित्रकलेची सुरुवात इ.स.च्या आरंभी झाली अजिंठ्याच्या लेण्यात इ.स.६ व्या ते ७ व्या शतकापर्यंतची चित्रकला आढळून येते. बौद्ध चित्रकलेचा उगम व विस्तार बौद्ध धर्माच्या प्रचाराकरीता झाला. या चित्रकलेच्या साहाय्याने बौद्ध धर्माचे महत्त्व त्याच्या प्रचाराला अमूल्य मदत झाली.

हिंदू चित्रकला पद्धती ही राजपूत राजाच्या आश्रयाने पुढे आली. या चित्रकलेचा उगम अजिंठा चित्रकलेपासूनच झाला असला पाहिजे. असे तज्ञांचे मत आहे. या चित्रकलेत पुष्कळ भाग आहेत. राजेराजवाडयांची चित्रे, इश्वरविषयक चित्रे, श्रीकृष्णाच्या लीला, रामायण महाभारतातील भावपूर्ण प्रसंग इ. चे वर्णन आढळते मोगल चित्रकला ही पर्शियन चित्रकलेपासून उत्पन्न झाली आहे. पण ती हिंदुस्थानात वाढल्याने राजपूताच्या सान्निध्याने त्या कलेत राजपूताच्या चित्रकलेचा मोठा अंश दिसून येतो.

### ❖ बौद्ध पूर्वकालीन चित्रकला :-

बौद्धकालाच्या पूर्वी भारत वर्षात चित्रकला उत्तम होती. याबद्दल पुष्कळ दाखले व पुरावे सापडतात. सिंध प्रांतात अलिकडे मोहनजोदाडों या ठिकाणी इ.स.पूर्व ५००० वर्षापूर्वीच्या काही उत्कृष्ट वस्तू सापडल्या आहेत.

### ❖ बौद्ध चित्रकला व तिचा प्रसार :-

बौद्ध चित्रकला हे धर्मप्रसाराचे साधन झाल्यामुळे या चित्रकलेला धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचे स्थान आहे. धर्मप्रसाराबरोबर ही चित्रकला दूरदूरच्या देशात गेली अशाच तज्हेची चित्रे ग्वाल्हेर संस्थानात, सिलोन मधील सिगीरीया, चीन, जावा, जपान इ. देशात प्रसार झाला.

### ❖ बौद्ध चित्रकलेचा कालखंड :-

बौद्धकालीन चित्रे फार प्राचीन असून आपल्या सुदैवाने शिल्लक साहिलेली दृष्टीस पडतात. याला कारण या चित्रांच्या अवघड जागा त्यामुळे याचा नाश् पावला नाही. सर्वात जुनी चित्रे पहिल्या शतकात काढली असावित. बौद्ध चित्रकलेचा अभ्यास करावयाचा झाल्यास अजिंठा बौद्ध चित्रकलेचा करावा लागेल कारण अजिंठा चित्रकला बौद्ध चित्रकलेचा उत्कृष्ट नमुना आहे ही सर्वात जुनी व नितांत मनोहर आहे. ही जिथे तिथे लेण्यांत, भिंतीवर, छतांवर व खांबावर रेखाटलेली आहेत.

या ठिकाणी एकंदर २९ लेणी आहेत. हल्ली सर्वच लेण्यांत चित्रे दिसत नाहीत. इ.स.२०० पासून ६५० पर्यंतच्या मधल्या काळांत कोरली गेली असावी असे तज्ञांचे मत आहे. त्यानंतर बुद्ध धर्माचा ज्हास झाला व ही चित्रकला येथेच संपुष्टात आली. अशी जगप्रसिद्ध चित्रकला इ.स.१८२४ पर्यंत अजिंठा लेण्यांतील माहिती कुणालाच माहिती नव्हती. त्यासाठी मद्रासच्या ब्रिटीश सैन्यातील लेफटनंट जे.ई. अलेक्झांडर यांनी ती पाहिली व १८२९ मध्ये मुंबईत शोधनिबंध वाचला.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

❖ **अभिजातकला :-**

हिंदी चित्रकलेच्या रत्नाकारातील अतिउत्कृष्ट प्राचीन रत्ने कुठे पाहवयास मिळतील तर ती अजिंठाच्या लेण्यातून होय त्यातील पूर्वजांची राहणी, हत्यारे, चालीरीती, राहण्याचे वाडे, घरे, दिवाणखाणे, दागिणे, वस्ती, इ. होय.

❖ **उपसंहार :-**

भारतीय चित्रकलेचे पुर्नजीवन करण्यासाठी जसे कलावंतानी झटले पाहिजे, तसे रसिकांनीही आपले रसिकत्व प्रगट केले पाहिजे. इतकी उत्कृष्ट चित्रकला आपल्या भारतात होती ही किती लोकांना माहिती आहे. पाश्चिमात्यांना त्यांचा धक्का बसला परंतु आपल्या देशातील किती लोकांना ही चित्रे पाहिली आहे. अशा चित्रकलेचे संगोपन होणे गरजेचे आहे.

**संदर्भग्रंथ:-**

१.सौदर्य आणि ललितकला : वा.गो. आपटे.
२.ललितकला मीमांसा : गो.चि. भाटे.
३.भारतीय चित्रकला : बालकृष्ण दाभाडे.
४.Indian Painting : Percy Brown
५.Ajanta : K.Vakil